श्रमिक एकजूट

# स्वारातीम विद्यापीठामध्ये युवक महोत्सव विद्यार्थी आणि उत्कृष्ट अंकाचा गुणगौरव

नांदेड (प्रतिनिधी)- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्ताने आज मंगळवार, दि.१८ सप्टेंबर रोजी विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीमधील हॉल क्र.३११ मध्ये विद्यार्थी विकास विभागातर्फे विविध युवक महोत्सवामध्ये पुरस्कार प्राप्त विद्यार्थी, संघव्यवस्थापक, प्रशिक्षक यांचा सत्कार तसेच उत्कृष्ट वार्षिक अंक पारितोषिक आणि इतर विविध स्पर्धा प्रमाणपत्राचे वितरण विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिलीप जी. म्हैसेकर यांच्याहस्ते पार पडले.



यावेळी व्यासपीठावर कुलसचिव डॉ. रमजान मुलानी, वित्त व लेखाधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. रवि एन. सरोदे, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. विठ्ठलसिंह परिहार यांची प्रमुख उपस्थिती होती.

स्वारातीम विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे इंद्रधनुष्य, पश्चिम विभागीय, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय युवक महोत्सवामध्ये शबरी हिरवे, तेजस धुमाळ, ज्योतिबा बडे, शांतेश्वर सरवदे, धम्मदीप सकपाळ, विशाल सोमवंशी, मनोज झुंगा, हरिदास उमाटे, स्वप्नाली जाधव, अभिजीत जाधव, संजय सोळंके, किरण मांडे, जयपाल मठपती, प्रवीण राठोड, मिनल शेटे, सुरेश चपेले, सौरभ कान्हेकर, गोविंदराज जाधव व राजेश सरोदे आदी विद्यार्थ्यांना रोख पारितोषिक देऊन सन्मानीत करण्यात आले.

उत्कृष्ट वार्षिक अंकाचे प्रथम पारितोषिक मानवतच्या कत्रुवार कला, रतनलाल काबरा विज्ञान आणि बी.आर. मंत्री वाणिज्य महाविद्यालयाच्या 'मानवता' या वार्षिक अंकास मिळाले. द्वितीय पारितोषिक खुपसरवाडी, विष्णुपुरी, नांदेडच्या मातोश्री प्रतिष्ठान अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'वसुंधरा' आणि सेलूच्या नूतन महाविद्यालयाचा वार्षिक अंक 'प्रेरणा' या वार्षिक अंकास विभागून देण्यात आले. वसमतच्या बहिर्जी स्मारक महविद्यालयाचा 'सत्यशोधक' आणि सोनपेठच्या कै. रमेश वरपूडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा 'प्रज्ञा' या वार्षिक अंकास तिसरे पारितोषिक विभागून देण्यात आले. विष्णुपुरी, नांदेडचे श्री गुरु गोविंद सिंघजी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा 'दृष्टी(स्पार्कल)' आणि भोकरचे दिगंबरराव बिंदू कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाचा 'वेदन' या वार्षिक अंकास उत्तेजनार्थ पारितोषिक विभागून देण्यात आले.

यावेळी विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, विविध प्राधिकरणावरील सदस्य, विद्यापीठ परिक्षेत्रातील विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक यांच्यासह विद्यापीठातील संचालक, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्यासंख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांनी केले तर आभार विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. राजेश्वर दुडूकनाळे यांनी मानले.